माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

**क्र. मुमाआ/नों.क्र.७६०४/२१/अ.क्र.१२८७/२५/०१**

**श्री. रियाज मस्तान शेख**
बामणवाडा, सी.पी.डब्ल्यू.डी ऑफिस समोर,
एम.सी.छगला मार्ग, विलेपार्ले (पूर्व) मुंबई-४०००९९

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) के/पूर्व विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त
के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,म.न.पा. मुंबई इमारत,
पहिला मजला, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पू) मुंबई – ४०० ०६९.

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ व का) के/पूर्व विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त
के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,म.न.पा. मुंबई इमारत,
पहिला मजला, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पू) मुंबई – ४०० ०६९.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १८.०६.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित. |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १०.१२.२०२० | २४.१२.२०२० | २२.०१.२०२१ | ०४.०३.२०२१ |

अपीलार्थी यांनी माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१०.१२.२०२० रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी “मा. राज्य मंत्री (नगर विकास) महाराष्ट्र राज्य यांचे दिलेले आदेशानंतर करण्यातआलेली कार्यवाहीची लिखील स्वरुपात माहिती व सदर विषयावर करण्यात आलेली चौकशी, अहवालची संपूर्ण साक्षांकित झैरोक्स प्रत” माहितीची मागणी केलेली आहे.

सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.१२.२०२० रोजी "विभागातील अभिलेखावर उपलब्ध असलेल्या माहितीचे निरीक्षण केल्यानंतर छायांकित प्रतीसाठी लागणारे शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल", असे उत्तरान्वये कळविले आहे.

अपीलार्थी यांनी दि.२२.०१.२०२१ रोजी कलम १९(१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "माहिती अर्जात नमूद केल्याप्रमाणे माहिती मिळाली नाही", असे कारण नमूद करुन प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. त्यावर दि.०४.०३.२०२१ रोजी "जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का), के/पूर्व यांनी अपिलकारास माहिती अधिकार अर्जाच्या उत्तराची छायांकित प्रत ७ दिवसांत पोस्टाने पाठवावी" असे आदेश पारित करून प्रथम अपिल निकाली काढण्यात आले.

अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगाकडे दि.०१.०७.२०२१ रोजी "अर्जात नमूद केल्याप्रमाणे अपेक्षित माहिती मिळाली नाही", असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदर द्वितीय अपीलावर आज दि.१८.०६.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपीलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) के/पूर्व विभाग व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता अनुपस्थित आहेत.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की,प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) के/पूर्व विभाग यांनी विहित मुदतीत कार्यालयाच्या अभिलेखाचे निरीक्षण करण्याचे आदेश निर्गमित केले आहे. अपिलार्थी यांनी ४ वर्षांत याबाबतीत कोणतीही कार्यवाही केली असल्याचे प्रत्यक्षात आढळून येत नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थी यांना उपरोक्त माहिती प्राप्त करून घेण्यास स्वारस्य असल्याचे आढळून येत नाही. ही बाब लक्षात घेता प्रस्तुत अपिल निकाली काढून नस्ती बंद करण्यात येत आहे.

**आदेश**

**वरील अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १८.०६.२०२५**

State Information Commission
Maharashtra